Publication: Tarun Bharat
Date: 30/3/2019
Page: 6
Column: 2-3

तरुण भारत संवाद
शनिवार ३० मार्च २०१९

# वीज वितरण कंपनीकडून 'अर्थअवर' पाळण्याचे आवाहन

## एईएमएलतर्फे पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न

प्रतिनिधी
मुंबई

अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ह्या खासगी वीज वितरण कंपनीने पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. या कंपनीने शहरातील आपल्या २७ लाख ग्राहकांसह सर्व भाग धारकांना आज, शनिवारी अर्थअवर पाळण्याचे आवाहन केले आहे. यासाठी आपल्या घरांतील व आस्थापनांतील वीजवापर संध्याकाळी ८.३० ते ९.३० या काळात स्वच्छेने बंद ठेवून एक शाश्वत भविष्यकाळ घडवण्यासाठी पाठिंबा देणार आहेत.

याबाबत एईएमएल प्रवक्ते म्हणाले, एईएमएल ही एक पर्यावरणाच्या दृष्टीने सजग संस्था आहे आणि अर्थ अवर या उपक्रमाच्या माध्यमातून आम्हाला सर्व भागधारकांमध्ये शाश्वत जीवनाचा प्रसार करायचा आहे. संसाधनांचे संवर्धन करणे व त्यांचा कार्यक्षमतेने वापर करणे महत्त्वाचे आहे, यावर एईएमएलचा विश्वास आहे. गेल्या दहा वर्षांहून अधिक काळापासून १८० राष्ट्रे व प्रदेश एकत्र येऊन अर्थ अवर या उपक्रमाला पाठिंबा देत आहेत व स्वेच्छेने वीजवापर बंद ठेवण्याच्या या उपक्रमात सहभाग घेत आहेत. युक्तिवादाच्या माध्यमातून प्रभाव निर्माण करण्यात तसेच विजेचे जतन, शाश्वतता व संसाधन कार्यक्षमता याबद्दल जागरूकता वाढवण्यात हा उपक्रम यशस्वी ठरला आहे.